दैनिक मराठवाडा पत्र



# नायब तहसीलदार पदाचे काम करणे म्हणजे काटेरी कसरत, ही काटेरी खुर्ची धारक यांनी यशस्वीपणे सांभाळली- तहसिलदार वैशाली पाटील

### नायब तहसीलदार भगीरथ धारक यांचा सेवापूर्ती निमित्त सपत्नीक सत्कार

**आष्टी । प्रतिनिधी**

सर्वसामान्य लोकांचे कामे हे महसूल विभागात असतात तहसीलच्या वेगवेगळ्या विभागात काम करून लोकांचे मने जिंकणे म्हणजे जिक्रीचे काम असून नायब तहसीलदार भगीरथ धारक यांनी काटेरी खुर्ची यशस्वीपणे सांभाळी असून त्यांना पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देत त्यांचा तहसीलदार वैशाली नेमगोंडा पाटील यांनी गुणगौरव करत सपत्नीक सत्कार केला .आष्टी तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार भगीरथ धारक यांची प्रामाणिक व इमानदार सेवा कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले. धारक नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. भगीरथ धारक यांच्या मातोश्रीचे नुकतेच निधन झाल्याने हा सत्कार सोहळा अत्यंत साध्या पद्धतीने तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडला.यावेळी कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी भगीरथ धारक यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला. ते अत्यंत शांत,



मनमिळाऊ व प्रेमळ स्वभावाचे असल्याचे सांगून त्यांनी कार्यालयातील प्रत्येक टेबलावरचे काम उत्कृष्ट पद्धतीने केले व कोणत्याही नागरिकाची कधीही अडवणूक केली नाही, अशी भावना व्यक्त केली. तहसीलदार वैशाली पाटील म्हणाल्या, भगीरथ धारक यांनी अत्यंत प्रामाणिकपणे काम केले. मी बाहेरगावी किंवा मिटिंगला असताना ते फोनवर संपर्क साधून तातडीची कामे पूर्ण करत. सर्वसामान्यांची अडवणूक त्यांनी कधीच केली नाही. आष्टी तालुका मोठा असून नागरिक दूरवरून येतात, त्यामुळे त्यांचे काम झालेच पाहिजे, असे ते सहकाऱ्यांना सांगत.आष्टी तहसिल कार्यालयात कनिष्ठ लिपिक ते नायब तहसीलदार पदापर्यंत आपल्या कार्याच्या द्वारे वेगळी चूनुक दाखवून आपला आगळावेगळा ठसा भगीरथ धारक यांनी त्यांच्या सेवेतून निर्माण केला होता. दि. ३१ मार्च २०२६ रोजी भगीरथ धारक हे त्यांच्या ३९ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर नियोतन वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्याबद्दल त्यांचा सपत्नीक सत्कार तहसील कार्यालयात सोमवार दि.३० रोजी सायंकाळी ५ वा. आयोजित करण्यात आलेल्या सेवानिवृत्त कार्यक्रमात तहसिलदार पाटील बोलत होत्या. यावेळी पुरवठा विभागाच्या नायब तहसीलदार अश्विनी पडोळे , भगीरथ धारक हे सपत्नीक व्यासपीठावर उपस्थित होते. पुढे बोलतांना पाटील म्हणाल्या, महसूल विभागात काम करत असताना खुप जिक्रीचे काम असून, या पदावर काम करणे ही काटेरी खुर्ची धारक यांनी व्यशस्वीपणे सांभाळली असल्याचेही तहसिलदार पाटील यांनी सांगितले. सत्काराला कर्मचारी व अधिकाऱ्यांची उपस्थिती यावेळी नायब तहसीलदार अश्विनी पडोळे,सहाय्यक महसूल अधिकारी सोनटक्के, चव्हाण, अव्वल कारकून वाघमारे मॅडम, वीर मॅडम, महसूल सहाय्यक दिलीप गालफाडे, संजय बहिरवाल, गारुळे, अशोक धोंडे, लिपिक गोरे, ठाणगे, निमसे, लोखंडे, सानप, जाधव, सुशील शिंदे, सुशील क्षीरसागर, बोंदार्ड अक्षय, जायभाय, गुप्ता, मीरा नजान, धोंडे, काळे, गर्जे, पिंपळे, सेवा निवृत्त मंडळ अधिकारी शिंदे, तुकाराम भवर, शरद मेंगडे, जालिंदर वाढरे, दादा शिंदे, सामाजिक कार्यकर्ते सचिन पवार आदी उपस्थित होते.तहसीलदार वैशाली पाटील यांनी धारक यांच्या कुटुंबासह साधेपणाने सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

'मी मनापासून जनतेची केली सेवा' – भगीरथ धारक :सत्काराला उत्तर देताना भावुक अवस्थेत भगीरथ धारक म्हणाले, मी अतिशय मनापासून जनतेची सेवा केली. सेवा करताना माणसे जोडण्याचे काम केले. माझ्या मुलीच्या साखरपुड्याला व मातोश्रीच्या निधनावेळी तालुक्यातील नागरिक, ग्रामस्थ व पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दिलेला स्नेह हीच माझ्या कामाची खरी पावती आहे.

## युवा पत्रकार अंकुश गवळी व लहु गवळी यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

**वडवणी । प्रतिनिधी**

तालुक्यातील आदर्श देवगाव येथील समाजभूषण युवा पत्रकार अंकुश गवळी व लहु गवळी यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी वडवणी ज्ञानदीप गुरूकुल वडवणी येथे शैक्षणिक शालेय साहित्य वाटप व बीड येथील जिव्हाळा अनाथ आश्रम येथे खाऊ वाटप करण्यात आले आहे. दिवसेंदिवस वाढदिवस करण्याच्या पद्धती आपण बदलताना पाहत आहोत परंतु या गोष्टींना बाजूला ठेवून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वाढदिवसाच्या निमित्ताने शालेय साहित्य वाटप केले असे नवीन उपक्रम युवकांनी राबवले पाहिजे असे प्रतिपादन ज्ञानदीप गुरुकुल चे संचालक श्री ढेरे सर यांनी केले



आहे. उपक्रम राबवणाऱ्या युवकाला परिसरातील माणसांनी जपले पाहिजे या कार्यक्रमाला ज्ञानदीप गुरुकुल चे संचालक ढेरे सर युवा उद्योजक गणेश सुरवसे युवा नेते दत्ता गवळी गणेश काळे इत्यादी उपस्थित होते वाढदिवसानिमित्त संपूर्ण राज्यभरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे .राजकीय नेते सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर पत्रकार वकील व्यापारी तसेच त्यांच्या मित्र परिवाराने त्यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या पत्रकार अंकुश गवळी यांनी पत्रकारितेत आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे त्यांच्या निर्भीड आणि सत्य न्यायाच्या मार्गावर चालत त्यांनी अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली त्यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभरातून शुभेच्छा संदेश फोन कॉल आणि सोशल मिडियावर पोस्टच्या माध्यमातून त्यांच्या शुभेच्छा चा वर्षाव होत आहे . अनेक मान्यवरांनी त्यांच्याबद्दल कौतुक केले असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत राजकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज नेत्यांनी त्यांना शुभेच्छा देताना त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे. तसेच सामाजिक संस्थाचे कार्यकर्ते विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित त्यांना शुभेच्छा दिल्या. वाढदिवसानिमित्त विविध ठिकाणी सत्कार समारंभ व सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस साजरा करण्यात आला आहे. यावेळी गुरूकुल चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दोघांनी सर्वांचे आभार व्यक्त केले आहे..

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त हिवरा गडलिंग येथे भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

रयतेचे राजे, अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून 'मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था' यांच्या वतीने एका भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सिंदखेड (जि. बुलढाणा) तालुक्यातील हिवरा गडलिंग येथे या आरोग्य शिबिरात मातोश्री ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय पथकाने रुग्णांची मोफत तपासणी केली. डॉ. स्नेहल दिलीप पवार आणि त्यांच्या टीमने उपस्थित ग्रामस्थांच्या आरोग्याची काळजी घेत त्यांना योग्य ते वैद्यकीय मार्गदर्शन व उपचार दिले. स्त्रीचा आदर आणि रयतेचे



हित, हेच शिवरायांच्या रयतेच्या राज्याचे खरे गमक होते.

छत्रपती शिवाजी महाराजांचा हाच लोककल्याणाचा आणि रयतेच्या सेवेचा महान आदर्श डोळ्यांसमोर ठेवून या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. केवळ प्रतिमा पूजन न करता, गोरगरीब आणि गरजूंच्या आरोग्याची काळजी घेऊन अशा विधायक कार्यातून महाराजांना खऱ्या अर्थाने आदरांजली वाहण्यात आली, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे सचिव तेजस दिलीप पवार, रोहन बाबासाहेब डोळस यांच्यासह संस्थेचे सर्व सदस्य आणि सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. शिवरायांच्या विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या या समाजोपयोगी उपक्रमाला हिवरा गडलिंग व परिसरातील नागरिकांनी भरघोस प्रतिसाद दिला असून, याप्रसंगी बहुसंख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराजांना पुण्यतिथीनिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये अभिवादन



**बीड । प्रतिनिधी**

आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांना पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रम मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांनी 'छत्रपती शिवाजी महाराज आदर्श राज्यकर्ता' याविषयी विद्यार्थ्यांना व्यापक मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचालन पवळ यु.बी., प्रास्ताविक संतोष मेश्राम, आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू.एस.वाघमारे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आर.बी. घुले यांनी प्रयत्न केले. याप्रसंगी आनंदशास्त्रालयाच्या अधीक्षक डी.व्ही. खरसाडे, शिक्षक श्रीमती एन.जी. मुंडे, सय्यद ए.एन., तसेच शिक्षकेतर कर्मचारी भारत कोळेकर, एस.एस. गायकवाड, एन.पी.गायकवाड व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून सौ. के.एस.के. महाविद्यालयाला प्रोत्साहन अनुदान प्राप्त

**बीड । प्रतिनिधी**

क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी आणि खेळाडूंना दिल्या जाणाऱ्या उत्तम सोयी-सुविधांची दखल घेत, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत सौ. के.एस.के. महाविद्यालयाला विशेष प्रोत्साहन अनुदान मंजूर करण्यात आले आहे. या अनुदान प्राप्तीसाठी डॉ. अमृतसिंग बिसेन यांनी विशेष प्रयत्न केले. या अनुदानामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या सक्षमीकरणाला मोठी चालना मिळणार आहे असे प्रतिपादन नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश



क्षीरसागर यांनी केले. स्थानिक पातळीवर खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आणि क्रीडा साहित्य तसेच पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या क्रीडा धोरणांतर्गत हे अनुदान दिले जाते. सौ. के.एस.के. महाविद्यालयाने सातत्याने जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावर विविध खेळांमध्ये यश संपादन केले आहे. महाविद्यालयाच्या या यशाची दखल घेऊन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड यांनी हे प्रोत्साहन अनुदान प्रदान केले आहे. या निधीचा उपयोग प्रामुख्याने अत्याधुनिक क्रीडा साहित्य खरेदी, मैदानांची निगा आणि खेळाडूंना सरावासाठी लागणाऱ्या अद्ययावत सुविधांसाठी केला जाणार असल्याचे महाविद्यालय प्रशासनाकडून सांगण्यात आले. या यशाबद्दल नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर, सहसचिव डॉ. दीपाताई क्षीरसागर, संस्थेच्या सदस्य डॉ. सारिकाताई क्षीरसागर, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. विश्वंभर देशमाने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. खान ए. एस., पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर, क्रीडा संचालक डॉ. भागचंद सानप व कमवि शिक्षक डॉ. अमृतसिंग बिसेन यांनी आनंद व्यक्त केला आहे. जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी महाविद्यालयाच्या क्रीडा परंपरेचे कौतुक करून भविष्यातही अशाच प्रकारे उत्कृष्ट खेळाडू घडवण्याचे आवाहन केले आहे. या विशेष कामगिरीबद्दल खेळाडू आणि क्रीडाप्रेमींमधून महाविद्यालयावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## राज्यस्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सव स्पर्धेत दीनानाथ बालकाश्रमाचे नेत्रदीपक यश



**बीड । प्रतिनिधी**

महिला व बाल विकास अंतर्गत चाचा नेहरू बाल महोत्सव स्पर्धा दिनांक २८ ते ३० मार्च २०२६ या कालावधीत सोलापूर येथील सिंहगड इन्स्टिट्यूट येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत श्री सद्गुरु बंजारा सेवा संघ बीड संचलित, दीनानाथ बालकाश्रमच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले.

या स्पर्धेत लहान गट कबड्डी या स्पर्धेत छत्रपती संभाजी नगर विभागातून दीनानाथ बालकाश्रमाच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय पारितोषिक पटकाविले. तर रिले छोटा गट या ही स्पर्धेत या विद्यार्थ्यांनी द्वितीय पारितोषिक पटकावले. सहभागी सर्व विद्यार्थी व त्यांचे दिशादर्शक चव्हाण बी.एल. सर यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री दिनेशराव पवार, मार्गदर्शक सुशीलभाऊ पवार, संस्थेचे सचिव अतुलभाऊ पवार, प्राचार्य खंदारे सर मुख्याध्यापक शिंदे सर सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी हार्दिक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी स्वीकारला पदभार

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी म्हणून विनय गौडा जी.सी. यांनी आज आपल्या पदाचा पदभार स्विकारला. जिल्ह्यातील शिक्षण, आरोग्य यासह पर्यटन विकास या सारख्या क्षेत्रांवर भर देत सर्वांगिण विकास करण्यासाठी आपण काम करु असे त्यांनी यावेळी सांगितले.

मावळते जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्याकडून विनय गौडा जी.सी. यांनी आपला पदभार आज स्विकारला. त्यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. नूतन जिल्हाधिकारी गौडा यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी सामान्य शाखा श्रीमती संगिता राठोड, उपजिल्हाधिकारी रोहयो रुपेश सिनगारे, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, नगरपालिका प्रशासन



विभागाचे सह आयुक्त सौरभ जोशी, सहा. आयुक्त ऋषिकेश भालेराव आदी यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गौडा यांनी मनोदय व्यक्त केला की, छत्रपती संभाजीनगर जिल्हा हा सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचा जिल्हा आहे. पर्यटन विकासाला चालना देतांनाच शिक्षण, आरोग्य, जीवनोन्नती उपक्रम, रोजगारभिमुखतेला चालना देणे अशा विविध क्षेत्रात काम करुन जिल्ह्याचा सर्वांगिण विकास करण्यास आपण प्राधान्य देऊ, असे त्यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले.

श्री. दिलीप स्वामी यांनी या जिल्ह्यात काम करतांना आलेले अनुभव हे सुखद होते असे सांगितले. निवडणूकांचा कालावधी मोठा असतांनाही मोठ्याप्रमाणावर विकासाची कामे मार्गी लावता आलीत,याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. बाल विवाह प्रतिबंध, प्रसवपूर्वगर्भलिंग तपासणी या बाबींवरही काम केले. प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख करण्यावर आपण भर दिला, असेही त्यांनी सांगितले.

## सुशिल भाऊ पवार यांचा वाढदिवसानिमित्त 'पसायदान' प्रकल्पाला साहित्य वाटप




**बीड । प्रतिनिधी**

सुशिल भाऊ यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे बंधू अतुल भाऊ पवार यांच्या संकल्पनेतून गुरुवार दि.२ एप्रिल २०२६ रोजी पसायदान सेवा प्रकल्प, ढेकणमोहा येथे अनाथ विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात आला. अनाथ विद्यार्थ्यांना वाढत्या उन्हाच्या झळा बसू नयेत म्हणून मोठे कुलर, फॅन व अत्यावश्यक साहित्य भेट देण्यात आले. या कार्यक्रमास श्री. सद्गुरु बंजारा सेवा संघ संस्थेचे अध्यक्ष श्री. दिनेशराव पवार, संस्थेचे सचिव अतुलभाऊ पवार, व अतुल आबासाहेब पवार, शुभम राठोड, आकाश पवार, राजु जाधव, दिपक पवार, कृष्णा पवार, रमेश पवार व मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार दि. ०४ एप्रिल २०२६ ●

## थोडक्यात...

### प्रशासनाने वेळेत या तक्रारीची दखल घेतली असती, तर बीड शहरातील हा सिग्नल कोसळण्याची घटना घडली नसती : शिराळे



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील नगर नाका चौक येथे उभारण्यात आलेल्या ट्रॅफिक सिग्नलबाबत युवासेना जिल्हाप्रमुख गणेश भैया शिराळे यांनी दिनांक ३० मार्च २०२६ रोजीच जिल्हाधिकारी तसेच विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत लेखी तक्रार दाखल केली होती. त्यांनी या कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर शंका उपस्थित केल्या होत्या. विशेष म्हणजे, शिराळे यांच्या तक्रारीनंतर आज संबंधित ट्रॅफिक सिग्नल कोसळल्याची धक्कादायक घटना घडली आहे. त्यामुळे त्यांनी केलेले आरोप प्रत्यक्षात खरे ठरत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. सदर सिग्नलचे काम जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ अंतर्गत करण्यात आले होते. या कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आल्याचा आरोप शिराळे यांनी आपल्या तक्रारीत केला होता. तसेच या कामाची तांत्रिक तपासणी (Quality Check / Audit) करण्यात यावी, अशीही त्यांनी मागणी केली होती. दरम्यान, सिग्नल कोसळल्याच्या घटनेमुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणाची तात्काळ आणि सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी गणेश भैया शिराळे यांनी पुन्हा एकदा केली आहे.

### प्रा.डॉ.सारिका विश्वाबंर जाधव यांना पीएचडी. पदवी प्रदान



#### बीड जिल्ह्यातील रस्त्यांचे जाळे यावर केले संशोधन

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मौजे साखरे बोरगांव येथिल कै. प्रल्हादराव जाधव यांची नात व श्री.विश्वाबंर अण्णा जाधव यांची कन्या प्रा. डॉ. सारीका जाधव .यांना शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च समजली जाणारी पीएच.डी.( विद्यावाचस्पती )ही पदवी.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने प्रदान केली आहे.त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर भूगोल विभागा अंतर्गत. बीड जिल्ह्यातील रस्ते वाहतूक जाळ्याचा भौगोलिक अभ्यास या विषयावर जनविकास महाविद्यालय, बनसारोळा येथील भूगोल विभागाचे संशोधक मार्गदर्शक प्रा. डॉ.पिसाळ एस.जी.यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदिर्घ शंशोधन करून आपला शोधप्रबंध विद्यापीठाला सादर केला होता.त्यास विद्यापीठाने २० फेब्रुवारी २०२६ रोजी मान्यता देवून त्यांना पीएच.डी.ही पदवी नुकतीच प्रदान केली आहे. या त्यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून कुटुंबीय, मित्रपरिवार व शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.त्यांच्या या यशाबद्दल बंकट स्वामी संस्थान नेकनूर चे मठाधिपती ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे,ह.भ.प.नाना महाराज कदम,व साखरे बोरगांव येथिल अग्नीशमन अधिकारी मा.शिवाजीराव झनझन,राम नाईकवाडे,विष्णु चव्हाण,सरपंच गजानन घरत,माजी सरपंच बाबासाहेब देवगुडे ,पोलीस पाटील तुकाराम घरत,सखाराम घरत,प्रा.डॉ.अशोक देवगुडे,प्रा.श्रीकृष्ण झनझन,रजनीकांत जाधव,दिलीप जाधव,नाना जाधव,बंडू जाधव,संभाजी जोगदंड आदिनी अभिनंदन केले आहे. त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

### नवनिर्वाचित पोलीस युवकांचा पै.सतीश शिंदेकडून सत्कार!

#### यशस्वी युवकांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली तर बळ मिळतं : पै.सतीश शिंदे



**आष्टी । प्रतिनिधी**

आई-वडिलांच्या डोळ्यातील स्वप्न पूर्ण करण्याची जिद्द उराशी बाळगून युवक भविष्य घडण्यासाठी धावपळ करतात त्यावेळी त्यांना पाठबळ देणं कर्तव्य असतं त्याच पद्धतीने ते यशस्वी झाल्यावर त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप ही तितकीच महत्त्वाची असते. कोणत्याही क्षेत्रात युवकांनी यश संपादन केलं तर त्यांच्या पाठीवर नेहमीच कौतुकाची थाप देणारे सतीश शिंदे यांनी नवनिर्वाचित नऊ पोलीस युवकांना सन्मानित करून कौतुकाची थांब दिल्याने युवकांनाही पाठबळ मिळाले आहे. जय हनुमान तालीम येथे नवनिर्वाचित पोलीस झालेल्या युवकांचा सत्कार समारंभ कार्यक्रम राष्ट्रवादी युवक जिल्हाध्यक्ष सतीश आबा शिंदे यांनी आयोजित केला होता. यामध्ये नऊ नवनिर्वाचित पोलीस युवकांचा सन्मान करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. आई-वडिलांचा स्वप्न साक्षात उतरवणारे हे युवक भविष्यकाळात त्यांच्या हातून समाजाची सेवा घडावी हीच अपेक्षा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सतीश आबा शिंदे यांनी यावेळी व्यक्त करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या..

# 'छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी रोड कामांमधील बोगसगिरी थांबवावी'

## भाजपा नेते नवनाथ शिराळे पाटील यांचे निवेदन



● छत्रपती शिवाजी महाराज चौक ते अशोक नगर पर्यंत चाललेल्या मेन रस्त्याच्या कामाच्या संबंधित गुट्टेदाराला प्रशासनाने कडक आदेश देऊन तात्काळ जलद गतीने काम करण्यास भाग पाडावे हो नागरिकांना रहदारीसाठी रस्ता मोकळा करावा व मेन रस्ता महामार्ग तात्काळ जलद गतीने जुनी पूर्वीचे सिमेंट रोडची कामेही तात्काळ मार्गे लावावेत व सध्या चाललेले रस्त्याचे बोगस काम माती टाकून या रस्त्यावर माती टाकण्यात येऊ नये चांगल्या प्रकारे मुरूम भरण्यात यावा आणि या भागाचे इंजिनिअर यांनी देखील चांगल्या प्रकारे या कामाकडे लक्ष घालावे व कुठेही रस्त्याच्या बाबतीत बोगसगिरी होऊ नये याची दक्षता केवी या रस्त्यावर पाणी देखील मारल्या जात नाही पाणी मारून रस्त्याचे चांगल्या प्रकारे बुलडोझरने दबाई करावी चांगला रस्ता मजबूत करावा होय रस्त्याच्या कामाच्या बाबतीत कुठेही बोगसगिरी करू नये असे आव्हान देखील या निवेदनाद्वारे भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे

**बीड । प्रतिनिधी**

सध्या बीड शहरातून मेन भागामध्ये सुरू असलेल्या म्हणजे श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून ते अशोक नगर पर्यंत सध्या मेन रोडचे काम चालू आहे या रोडचे काम अतिशय दर्जे दार व्हावे आणि मंद गतीने चाललेले काम हे जलद गतीने प्रशासनाने करण्यासाठी संबंधित गुत्तेदाराला कडक सूचना द्याव्यात आणि सर्व नागरिकांना रहदारीसाठी हा मेन रोड तात्काळ उपलब्ध करून द्यावा असे आवाहन प्रसिद्ध पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा श्री नवनाथ जी अण्णा शिरोळे पाटील यांनी केले आहे आणि हा रस्ता अतिशय दर्जेदार आणि चांगल्या प्रकारे करावा कुठेही या रस्त्यावर खड्डे असू नयेत चांगल्या प्रकारे क्वालिटीचा रस्ता नागरिकांच्या रहदारीसाठी संबंधित गुत्तेदाराने करावा त्याच्यासाठी जिल्हा प्रशासनाने या रस्त्याकडे लक्ष घालावे व संबंधित गुत्तेदारांकडून चाललेल्या रस्त्याचे मंद गतीचे काम जलद गतीने करून द्यावे कारण भविष्यामध्ये लवकरच आता येणाऱ्या मे महिन्यामध्ये पावसाळा सुरू होत आहे म्हणून पावसाळ्यामध्ये या रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या कुठल्याही नागरिकांना या रस्त्यावरून जाण्या येण्यासाठी त्रास होऊ नये चांगल्या प्रकारे त्यांना या ठिकाणाहून रहदारी करता यावी याची दक्षता देखील संबंधित गुत्तेदारांनी आणि प्रशासनाने घ्यावी असे आव्हान या प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे नेते मा श्री नवनाथ अण्णा शिरळे पाटील यांनी केले आहे.

# जेल बाहेर येताच रिल्स, जल्लोषाचे व्हिडिओ व्हायरल

## मारहाण प्रकरणी खोक्या निर्दोष

**बीड । प्रतिनिधी**

कामगाराला बॅटने मारहाण केल्याच्या प्रकरणात अटकेत असलेला सतीश उर्फ खोक्या भाई याची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. खोक्यावर गुन्हा दाखल होताच तो अनेक दिवस फरार होता परंतु त्याला बीड पोलिसांनी ताब्यात घेतल्यापासून आरोपांचे राजकीय वादळ उठले होते.त्याच्यावर एका बड्या नेत्याचा आशीर्वाद असल्याचा आरोप विरोधक करत होते. पोलिसांनी त्याला कारागृह बाहेर जेवण देताना व्हिडिओ व्हायरल झाल्याने पोलीस देखील



निलंबित करण्यात आले होते. अनेक महिन्यापासून कारागृहात असलेल्या खोक्या भाईची काल निर्दोष सुटका करण्यात आल्याने मित्रपरिवार भेटण्यासाठी एकत्र येत रिल्स व्हिडीओ करत सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आले. सुटकेनंतर कारागृहाबाहेर त्याच्या मित्रपरिवाराने मोठा जल्लोष साजरा केला. या संपूर्ण घटनेचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून शहरात त्याची चर्चा सुरू आहे. दरम्यान, संबंधित प्रकरणात न्यायालयाने पुराव्याअभावी खोक्या भाई याची निर्दोष मुक्तता केल्याची माहिती समोर येत आहे. या निर्णयामुळे एकीकडे त्याच्या समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण असून दुसरीकडे नागरिकांमध्ये विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.



# पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारांवर भाजपची वाटचाल सुरु: संस्कार भारतीचे कुलदीप धुमाळे यांचे प्रतिपादन

## बीडमध्ये पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाभियानाचे उदघाटन

**बीड । प्रतिनिधी**

पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारांवर आधारित भाजपची वाटचाल सुरु आहे. कार्यकर्त्यांमध्ये राष्ट्रभक्ती व विचारशक्ती रुजविण्यासाठी प्रशिक्षण महाभियान उपयुक्त ठरणार असल्याचे प्रतिपादन संस्कार भारतीचे कुलदीप धुमाळे यांनी केले.

शहरातील सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्या सभागृहात भाजप बीड शहर मंडळाच्या वतीने आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाभियानाचे उदघाटन शुक्रवारी (दि.३) उत्साहात पार पडले. यावेळी मार्गदर्शक म्हणून कुलदीप धुमाळे हे बोलत होते. कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, ज्येष्ठ नेते विजयकुमार पालसिंगणकर, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, प्रा.देविदास नागरगोजे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात वंदे मातरम व



महाराष्ट्र गीताने झाली.

पुढे बोलताना कुलदीप धुमाळे म्हणाले, पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या कार्याचा आढावा घेतला. पंडित दीनदयाल उपाध्याय हे भारतीय जनसंघाचे प्रमुख नेते होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून त्यांनी राष्ट्रभक्तीची बीजे रोवली. त्यांच्या विचारांवरच पुढे भाजपची उभारणी झाली असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, स्व. अटलबिहारी वाजपेयी, स्व. प्रमोद महाजन आणि स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याचाही त्यांनी उल्लेख केला. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारांवर भाजपची वाटचाल सुरू आहे. त्यांच्या परिश्रमामुळे पक्षाला यश मिळाले असून राष्ट्रभक्तीच्या विचारातून समाजात राष्ट्रचेतना जागृत झाली आहे. कार्यकर्त्यांमध्ये विचारांची देवाणघेवाण घडवून आणण्यासाठी असे प्रशिक्षण उपयुक्त ठरते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला चंद्रकांत फड, शांतीनाथ डोरले, अजय सवई, जगदीश गुरखुदे, शुभम धूत, नागेश तांबारे, सागर देशपांडे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक शहराध्यक्ष अशोक लोढा यांनी केले, तर सूत्रसंचालन संगीता धसे यांनी केले.

### ● योजनांची माहिती प्रदर्शित

कार्यक्रमस्थळी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती फलकांद्वारे मांडण्यात आली होती. यामुळे योजनांचा प्रचार-प्रसार झाला. तसेच, पक्षाचा इतिहासही याठिकाणी प्रदर्शित करण्यात आला होता.

### ● देशाला एकसंघ ठेवण्याचे कार्य जनसंघाने केले : प्रा.देविदास नागरगोजे

दुसऱ्या सत्राच्या मार्गदर्शन प्रसंगी प्रा.देविदास नागरगोजे यांनी सांगितले की, मी भाजपला अंतर-बाह्य ओळखतो. १०० वर्षांची परंपरा लाभलेला हा पक्ष आहे. देशाला एकसंघ ठेवण्यासाठी जनसंघाने कार्य केले. आज राज्यासह देशात भाजपची प्रचंड ताकद आहे. पंकजाताई मुंडे यांच्यासारखे बलाढ्य नेतृत्व आपल्या पाठीशी आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी काळात भाजपला ऐतिहासिक कामगिरी करायची आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

### ● ६ एप्रिल रोजी भाजपचा स्थापना दिवस उत्साहात साजरा करा : शंकर देशमुख

मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी सांगितले की, भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्या मार्गदर्शनाखाली पदाधिकारी व कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. अशा कार्यक्रमास मुख्यमंत्री, पंतप्रधान हे देखील कार्यकर्त्यांमध्ये बसून सहभागी होतात. 'प्रथम राष्ट्र, द्वितीय पक्ष आणि नंतर स्वत:' ही विचारसरणी पक्षाने रुजविली आहे. तसेच, येत्या ६ एप्रिल रोजी पक्षाचा स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे आवाहन त्यांनी केले.